**B.A. (Part–I) Examination**

**(Literature of Modern Languages)**

**MARATHI LITERATURE**

वेळ : तीन तास] [एकण गुण : 100

**सूचना :— सर्व** प्रश्न सोडवा.

1. खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 20

(अ) ‘‘एक तं मी अंदर होतो-तुमी सामायन द्या, नाई त तुमी अंदर व्हा .........’’

**किंवा**

‘‘तो फिर गाडीमे कायकु बैठा, क्या तेरे बापकी गाडी है ?’’

(आ) ‘‘तुझा बाप मला पोलिसाच्या ताब्यात द्यायला निघाला होता. ‘हातात बेड्या ठोकीन’, काळया पाण्यावर पाठवीन’ म्हणाला. आठवतयं का ?’’

**किंवा**

‘एका कामात दहा कामं! एम.ए.चा अभ्यास म्हणजे तुम्हाला काय चेष्टा वाटली होय ?’

(इ) अमर्याद मित्रा, तुझी थोखी अन्
    मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
    धूळीचेच आहे मला भूषण.

**किंवा**

काढ सखे, गळयातील
तुझे चांदव्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
उभे दिवसाचे दूत.

(ई) होय किनाऱ्यावरती अपुले
    आज सखे ने मंगल मीलन
जीवित दर्यापरी, नसे ते –
    केवळ सुंदर, केवळ भीषण.

**किंवा**

दूर देशी राहिलेले दीन त्याचे झोपडे
बापुडा अन् आज येथे पायवाटेला पडे!

2. ‘धग’ या कादंबरीच्या आधारे कौतिकची व्यक्तिरेखा स्पष्ट करा. 15

**किंवा**

‘धग’ या कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवा.

3. 'धग' कादंबरीच्या आधारे सकीनाचे व्यक्तिचित्रण करा. 10

**किंवा**

'धग' या कादंबरीतील कोणत्याही दोन हृदयस्पर्शी प्रसंगांचे वर्णन करा.

4. 'प्रेमा, तुझा रंग कसा ?' नाटकाद्वारे बल्लाळ यांची व्यक्तिरेखा स्पष्ट करा. 15

**किंवा**

'प्रेमा, तुझा रंग कसा ?' या नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

5. 'प्रेमा, तुझा रंग कसा ?' या नाटकातील बाजीरावचे व्यक्तिचित्र रेखाटा. 10

**किंवा**

प्रियंवदा यांची व्यक्तिरेखा वाचकास का भावते ते थोडक्यात सांगा.

6. 'विशाखा' या काव्यसंग्रहातील प्रेमविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा. 20

**किंवा**

'विशाखा' काव्यसंग्रहातील समाजजाणिवा स्पष्ट करा.

7. खालीलपैकी **एका** कवितेचे रसग्रहण करा : 10

(1) क्रांतीचा जयजयकार

(2) मूर्तिभंजक

(3) लिलाव.

139 139 139 139 139